प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;

For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. २८ ऑगस्ट २०२२**

**सिडकोची गृहनिर्माण क्षेत्रात पुन्हा एक विक्रमी कामगिरी**
**केवळ ४८९ दिवसांत ५०० स्लॅबचे काम केले पूर्ण**

मिशन 96 च्या अभूतपूर्व यशानंतर, तळोजा नोडमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत साकारण्यात येत असलेल्या महागृहनिर्माण योजनेंतर्गत केवळ ४८९ दिवासांत ५०० स्लॅबचे काम पूर्ण करत सिडको महामंडळाने पुन्हा एकदा डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या मार्गदर्शनाखाली गृहनिर्माण क्षेत्रात विक्रमी कामगिरी केली आहे.

**"प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून गृहनिर्माण योजनेतील घरांचे बांधकाम कमी कालावधीत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट सिडकोने निश्चित केले आहे. यामुळे गुणवत्तेशी तडजोड न करता सर्वसामान्यांना लवकरात लवकर घरे उपलब्ध करून देत, त्यांचे घराचे स्वप्न साकार करणे सुनिश्चित झाले आहे. ५०० स्लॅबचे केवळ ४८९ दिवसांत पूर्ण केलेले बांधकाम हा या उद्दिष्टातील मिशन 96 नंतरचा पुढील टप्पा आहे."**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सिडकोतर्फे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत साकारण्यात येत असेलेल्या महागृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईच्या विविध नोडमध्ये इमारतींचे बांधकाम सुरू आहे. या योजनेतील घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटातील नागरिकांकरिता उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सर्वसामान्यांच्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्यासाठी, घरांच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता घरांचे बांधकाम कमी कालावधीत पूर्ण करण्यावर सिडकोचा भर आहे. यापूर्वी मिशन 96 अंतर्गत प्रीकास्ट या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करत सिडकोने महागृहनिर्माण

योजनेंतर्गत बामणडोंगरी येथे केवळ 96 दिवसांत 96 घरे असलेल्या 12 मजली इमारतीचे बांधकाम पूर्ण केले होते.

या वेळेस महागृहनिर्माण योजनेंतर्गत तळोजा येथील सेक्टर-28,29,31 आणि 37 येथे साकारण्यात येत असलेल्या इमारतींमधील ५०० स्लॅबचे काम केवळ ४८९ दिवसांत पूर्ण करत सिडकोने पुन्हा एकदा गृहनिर्माण क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची मोहोर उमटवली आहे. दिवसाला 1.02 स्लॅब या विक्रमी वेगाने, प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून बांधकामच्या दर्जाशी कोणतीही तडजोड न करता सिडकोने हे काम पूर्ण केले आहे. सिडकोतील वास्तुशास्त्रज्ञ, नियोजनकार, अभियंते आणि प्रकल्प सल्लागार एएचसी, टीसीई-एचएसए यांनी डॉ. संजय मुखर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली आखणी करून ही विक्रमी कामगिरी पार पाडली आहे.

या कामगिरीद्वारे देशात परवडणाऱ्या दरातील गृहनिर्माण क्षेत्रा अंतर्गत वेगाने बांधकाम पूर्ण करण्याचा बहुमान पुन्हा एकदा सिडकोने प्राप्त केला आहे. जागतिक दर्जाच्या इमारतींचे बांधकाम विक्रमी वेगाने पूर्ण करण्याच्या दिशेने सिडकोची वाटचाल वेगाने सुरू झाली आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**

**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**